महिला व बालविकास विभागामार्फ़त राबविण्यात येणा-या विविध योजना व उपक्रम-

- मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे
- मुलींना स्वरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना – कराटे प्रशिक्षण
- शाळेत जाणार्या मुलींना सायकल वाटप
- महिला मेळावा आयोजित करणे
- आथिकदृष्ट्या गरीब स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर चालविणे
- महिलांना कायदेशीर / विधिविषयक सल्ला देणे
- किशोरवयीन मुलींना व मुलांना लैंगिक शिक्षण, जेंडर (Gender) प्रशिक्षण व जिवन कौशल्याने प्रशिक्षण देणे.
- महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे
- कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार देणे. (आठवड्यातून दोन वेळा १ उकडलेले अंडे अथवा २ केळी देणे)
- अंगणवाड्यांना साहित्य पुरविणे
- अंगणवाड्यांमध्ये परसबाग तयार करणे.
- बारावी पास मुलींना (MS-CIT) प्रशिक्षण देणे.
- आथिकदृष्ट्या गरीब व गरजु महिलांना,परितक्त्या,विधवा आर्थीक सहाय्य घरघंटी ,शिलाई मशिन वाटप करणे.

**योजना व माहिती**

**किशोरवयीन मुलींना जीवनकौशल्य जेंडर प्रशिक्षण देणे**

योजनेचे स्वरुप / माहीती :

ग्रामीण व आदिवासी भागातील मुली यांनी घ्यावयाची काळजी, अल्पवयात विवाह केल्यास त्याचे होणारे दुष्परीणाम यांसाठी प्रबोधन शिबीरे घेऊन कुपोषण, अभकमृर्त्यु, मातामृत्यु रोखण्यास मदत होते

**या वगामध्ये मुलींसाठी साधारणतः खालील बाबींचा समावेश असतो.**

१) स्त्रियांच्या मासिक पाळीचे शास्त्रर व उद्देश. समज व गैरसमज
२) मासिक पाळीच्या काळात आरोग्यविषयक घ्यावयाच्या काळजीची आवश्यकता.
३) गभधारणेचें शास्त्रर, सवसाधारणपर्णे कुटुंबनियोजनाची साधने.
४) बालविवाहामुळे आरोग्यास होणारे दुष्परिणाम.
५) लैंगिक छळ, त्यापासुन स्वसंरक्षण कसे करावे, कोणाची मदत घ्यावी. अशा परिस्थीतीत हेल्पलाईनचा उपयोग करणे.
६) एडस नियंत्रण.

योजनेत सहभागाच्या अटी व शर्ती व पात्रता :
१) या योजनेअंतर्गत सर्व सामाजिक प्रवगार्तील किशोरवयीन मुलींना सामावुन घेता येते.
२) या प्रशिक्षण वर्गात लैंगिक व विशिष्ट किशोरवयीन समस्यांबद्दल शिक्षण देण्यात येत.
३) या प्रशिक्षण वगासाठी महिला व बाल विकास समिती निश्चित करेल त्या स्वयंसेवी संस्थामार्फत/अंगणवाडी पयवेक्षिकार्मांफत प्रशिक्षण देण्यात येते.
४) प्रशिक्षण वर्गात 40/50 मुलींचा सहभागअसतो.
५) शाळेत/महाविद्यालयात शिकणार्या मुलीं आणि गळती झालेल्या मुलींसाठी या प्रशिक्षणवगार्चे आयोजन करण्यात येते.
७) प्रशिक्षण वर्गास मार्गदर्शन करणेकामी बाहेरील तज्ज्ञांना व डॉक्टरांना, मनोवैज्ञानिकांना निमंत्रित करण्यात येते.
8) ) प्रशिक्षण वर्गास प्रत्येकी 400/- रु.मानधन देणेत येते.

**आदर्श अंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार**

योजनेचे स्वरुप / माहीती :
अंगणवाडी सेविका यांना उत्कृष्ट कामकाजाबद्दल पारितोषिक देवुन त्यांचा सन्मान करणे. यामुळे अंगणवाडी सेविका यांना त्यांचे कामकाजात भरीव कामगीरी करण्यास प्रोत्साहन मिळते व त्याद्वारे योजनेचे काम जास्तीत जास्त प्रभावीपणे राबविण्यास मदत होते.

योजनेत सहभागाच्या अटी व शर्ती व पात्रता :
१) अंगणवाडी केंद्रातील मध्यम व तिव्र कुपोषित च्या बालकांची संख्या सर्वात कमी ठेवण्यात यश प्राप्त केलेल्या सेविका यांना या योजनेत सहभाग नोंदवितात.
2) संस्थात्मक प्रसुती, अधवार्षिक वाढदिवस, गरोदर नोंदणीचे प्रमाण, बालविवाह, बालमृत्यु व अभकमृर्त्यु या कामात १००% यश प्राप्त केलेल्या सेविका लाभास पात्र राहतात.
3) प्रत्येक प्रकल्पातुन तीन अंगणवाडी सेविका यांची माहिती जि.प. कडे सादर करण्यात येते.
4) जि.प.स्तरावर नियुक्त समिती पैकी एका अंगणवाडी सेविकेची निवड करतात.
5) पात्र अंगणवाडी सेविकेचा २०००/- चे किसान विकास पत्र प्रशस्तीपत्रक, शाल व श्रीफळ देऊन यथोचित गौरव करण्यात येतो
6) सदरचा कायक्रमासाठी नाटयमंदिर किवा प्रशस्त हॉल घेणेत येतो.

**मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना**

योजनेचे स्वरुप / माहीती :
महिला व मुलींना स्वसंरक्षणासाठी सक्षम करणे.
योजनेत सहभागाच्या अटी व शर्ती व पात्रता :
१) किशोरवयीन मुलींना या योजनेचा लाभ दिला जातो. मुलींना सशुल्क लाभ दिला जातो.
२) जि.प.सेस निधीतुन दिल्या जाणारा लाभ जाती भेद न करता दिला जातो.
३) योजनेंतर्गत कराटे प्रशिक्षण देण्यात येते याबाबत महिला व बाल विकास समिती प्रशिक्षण निश्चित करते.
4) प्रशिक्षणाचा कालावधी किमान तिन महिन्याचा असतो
5) एक बॅच सवसाधारणपर्णे 40 मुलींची असते
6) प्रशिक्षकांस प्रति लाभार्थी रु 6 ००/- प्रतिमहा पर्यंत मानधन देण्यात येते
7) संस्थेचे प्रशिक्षक हे शासनमान्य संस्थेचे ब्लॅक बेल्ट प्रमाणपत्र धारक असतात
8) सदरचे प्रशिक्षण शाळा, आश्रमशाळा, व महाविद्यालये यांच्या समन्वयाने आयोजीत करण्यात येते.
9) सदर प्रशिक्षणवर्ग सुरु करतांना तसेच त्याचा समारोप करतांना मा. जि.प. सदस्य, पं.स. सदस्य व इतर लोकप्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात येते

**१० वी व १२ वी पास मुलीना संगणक प्रशिक्षण देणे**

योजनेचे स्वरुप / माहीती :
दहावी व बारावी पास मुलींना संगणकाचे ज्ञान प्राप्त व्हावे हा योजनेचा उद्देश आहे.
योजनेत सहभागाच्या अटी व शर्ती व पात्रता :

१) सदर योजनेचा लाभ लाभार्थीनींनी गेल्या १० वर्षात अन्य कोणत्याही विभागाकडून घेतला नसल्याबाबत ग्रामसेवकाचा दाखला.
२) आदिवासी उपयोजना निधीतुन दिल्या जाणार्या लाभासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनु.जमाती व विशेष घटक योजने मधुन अनु. जातीच्या लाभाथीर्चीच निवड केली जावी. बिगर आदिवासी व जि.प.सेस निधीतुन दिल्या जाणारा लाभ जाती भेद न करता दिला जातो.
३) लाभार्थी मुलगी ही अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे कुटूंबीयापैकी तसेच शासकीय सेवेत कार्यरत कमचार्री /अधिकारी यांचे कुटुंबातील नसावी. तसा सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला आवश्यक असतो.
4) उमेदवार दहावी किवा बारावी उत्तीर्ण असावी.
5) उमेदवारास सदर प्रशिक्षणासाठी प्रति लाभार्थी र.रु.3050/- इतके अनुदान देय आहे.
6) लाभार्थीर्ची निवड ही बाल विकास प्रकल्पाधिकारी यांनी करुन त्यांची यादी संबंधित संस्थेकडे व जिल्हा कायालर्यास सादर करणेत येते.

### महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे

योजनेचे स्वरुप / माहीती :

महिलांना त्यांच्या कौटुंबिक, कायदेविषयक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी मदत तसेच कायदेविषयक मार्गदर्शन केले जाईल. तसेच योग्य त्या प्रकरणांमध्ये समुपदेशनही आयोजित केले जाईल. (उदा. हुंडाबळी प्रकरण, विभक्त कुटूंबाच्या समस्या, घरगुती अत्याचार, घरातुन बाहेर काढण्याची धमकी देणे, मारहाण करणे, रात्री-अपरात्री घरातुन बाहेर काढणे, घटस्फोटासाठी दबाव आणणे, घटस्फोट व पोटगी प्रकरण, मालमत्ता हक्क, लैगिक छळवणुक इ.) या समुपदेंशन केंद्राद्वारे महिलांना त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी मदत व कायदेविषयक मार्गदर्शन केले जाईल तसेच योग्य त्या प्रकरणांमध्ये समुपदेशनही आयोजित केले जाईल. उदा. हुंडाबळी प्रकरण, विभक्त कुटूंबाच्या समस्या, घरगुती अत्याचार, घरातुन बाहेर काढण्याची धमकी देणे, मारहाण करणे, रात्री-अपरात्री घरातुन बाहेर काढणे, घटस्फोटासाठी दबाव आणणे, घटस्फोट व पोटगी प्रकरण, मालमत्ता हक्क, लैगिक छळवणुक इ. मानसिकदृष्टया असंतुलीत महिलांचे सामाजिक मानसशास्त्रीय कायदेशिर समुपदेशनही यात अंतर्भुत राहील.

### भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दूल कलाम अमृत आहार योजना

अनुसूचित क्षेत्रात आहारातील उष्मांक (Calories) व प्रथिनाच्या (Proteins) कमतरतेमुळे स्त्रियांमध्ये कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असून आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण 33.1 टक्के एवढे आहे.आदवि◌ासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजन वाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात,असे अनके संशोधन अभ्यासावरून सिध्द झाले आहे.या पाश्वभूमिर्च्या अनुषंगाने अनुसूचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्याची योजना मंजूर करण्यात आलेली आहे.सदरची योजना पालघर जिल्हयातील जव्हार,जव्हार-2,मोखाडा ,वाडा,वाडा-2,विक्रमगड,डहाणू,कासा व तलासरी पुर्ण प्रकल्पात व पालघर , मनोर,वसई-2 या पेसाअंतर्गत येणा-या गावांत मंजूरी दिलेली आहे.